# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

## क्र. मुमाआ/नों. क्र. ४३०९/१९/अ.क्र. १४५/२२/०१

**श्रीमती रोजी कॅजेटन क्रॉस**
रुम नं. ०३, राम सजिवन दुबे चाळ,
हंस भुगरा लेन, पारसी वाडी, कालिना,
सांताक्रुझ (पूर्व) मुंबई – ४०००५५.

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ व का) एच/पूर्व विभाग**
एच/पूर्व विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, सहाय्यक आयुक्त,
एच/पूर्व विभाग यांचे कार्यालय, प्लॉट क्र. १३७, टीपीएस ५,
दुसरा रोड, प्रभात कॉलनी, सांताक्रुझ (पू.), मुंबई ४०० ०५५.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता एच/पूर्व विभाग**
एच/पूर्व विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, सहाय्यक आयुक्त,
एच/पूर्व विभाग यांचे कार्यालय, प्लॉट क्र. १३७, टीपीएस ५,
दुसरा रोड, प्रभात कॉलनी, सांताक्रुझ (पू.), मुंबई ४०० ०५५.

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : १४.०२.२०२२**

अपीलकर्ता : उपस्थित
जन माहिती अधिकारी : अनुपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : अनुपस्थित

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिलाचा दिनांक | प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| ०३.१०.२०१८ | - | १३.११.२०१८ | २४.०७.२०१९ |

अपीलकर्त्याने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम-६(१) अन्वये दि. ०३.१०.२०१८ रोजी जन माहिती अधिकाऱ्याकडे माहिती अर्ज सादर केला. सदर अर्जान्वये त्यांनी, रुम नं. ३७, राम संजिवनी दुबे चाळ, हान्स बुगरा लेन, पारसी वाडी, कलीना सांताक्रुझ (पूर्व), मुंबई या रुमचे निष्कासन केल्याबाबतची सविस्तर माहिती/छायांकित कागदपत्रांची मागणी केलेली होती.

AARTI

अपीलकर्त्याने आयोगाकडे दि. २०.०८.२०१९ रोजीच्या अर्जान्वये द्वितीय अपील दाखल केले असून त्याद्वारे असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिलेली नाही.

जन माहिती अधिकारी यांचे उत्तर धारिकेमध्ये दिसून येत नाही.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. २४.०७.२०१९ च्या आदेशान्वये जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांना पहिले ५०० पृष्ठांपर्यंतची माहिती नि:शुल्क देण्यात यावी व उर्वरित माहितीसाठी शुल्काचे चलन देण्यात यावे असे आदेश देऊन अपिल निकाली काढले.

आजच्या सुनावणीस अपिलकर्ता यांनी असे विशद केले की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाली नाही. तसेच त्यांना आर्थिक नुकसान व मानसिक त्रास झाला असून मोबदला हवा आहे.

जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. तरी अपिलाची सुनावणी तहकूब करण्यात येत आहे. पुढील सुनावणीस जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांना अपेक्षित असलेल्या माहितीसह उपस्थित राहावे. सदर **अपिलाची पुनर्सुनावणी दिनांक १७.०३.२०२२ रोजी दुपारी ०३.०० वाजता** आयोगात प्रत्यक्ष आयोजित करण्यात येत आहे. तरी अपिलकर्ता जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी स्वत: उपस्थित राहावे. त्यानंतर या प्रकरणी अंतिम आदेश पारित करण्यात येतील.

State Information Commission Maharashtra

**मुंबई**
**दिनांक : १४.०२.२०२२**

**(सुमित मल्लिक)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

AARTI